# प्रकरण तिसरे

## कागद चा वाङ्मयीन अभ्यास

कागूद चा वाङ्मयीन अभ्यास

प्रास्ताविक

१९७५ नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना आनंद पाटील यांच्या " कागूद " आणि " सावली " या दोन लघुकादंबऱ्या आणि पुरुषोत्तम बोरकर यांची " मेड इन इंडिया" या तीन कादंबऱ्या लक्षणीय असल्याचे आढळते. त्यामुळे १९७५ नंतरची मराठी ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करावयाचे ठरवल्यास प्रामुख्याने वरील तीन कादंबऱ्यांना विचारात घेणे आवश्यक ठरते. म्हणून प्रथम आपल्याला आनंद पाटील यांच्या"कागूद" या पहिल्या लघुकादंबरीचा सर्वांगीण अभ्यास करावयाचा आहे.

" कागूद " ही लघुकादंबरी प्रथम १९८० साली मौजच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. त्यानंतर सुमारे सहा वर्षांनी म्हणजे १९८६ साली ती पुस्तक रूपाने प्रकाशित झाली.

" कागूद " या लघुकादंबरीला रूढ अर्थाने कथा नाही. गहाण पडलेले शेत विकत घेणे ही मध्यवर्ती घटना आहे. अशा घटनेभोवती गुंफलेली ही लघुकादंबरी ग्रामीण जीवनाच्या एका अंगाचे दर्शन अत्यंत प्रत्ययकारीपणे आणि तपशीलवारपणे घडवते.

या लघुकादंबरीतील बाबू आबा, नाना, सेक्रेटरी ही पात्रे लेखकाने अत्यंत जिवंतपणे रेखाटली आहेत. ग्रामीण माणसाच्या स्वभावाचे कंगोरे अत्यंत संवेदनशीलतेने या कादंबरीत येतात. त्यामुळे ही कादंबरी लक्षणीय ठरते. तथापि ही कादंबरी लक्षणीय ठरण्याची आणखी दोन

कारणे म्हणजे पश्चिम कोल्हापूर जिल्हा प्रदेशापट्ट्यातील नवे भावविश्व जे यापूर्वी क्वचित मराठी ग्रामीण कादंबरीत आले आहे. आणि दुसरे कारण म्हणजे लेखकाची समर्थ भाषाशैली.

याशिवाय मराठी ग्रामीणकादंबरीच्या निवेदनासाठी प्रमाण भाषा असावी की ग्रामीणभाषा ? या वादाची कोंडी " कागूद " च्या निवेदनशैलीने फोडली आहे असे म्हटल्यास गैरलागू ठरणार नाही. धड ग्रामीणही नव्हे आणि धड शहरीही नव्हे अशा संमीश्र स्वरूपाचे निवेदन या कादंबरीत येते. अशा स्वरूपाची भाषा या लघुकादंबरीत का आलेली आहे. हे आपण सविस्तरपणे पुढे पाहणारच आहोत.

आशय आणि अविष्काराच्या दृष्टीने नाविन्य लेवून आलेल्या या कादंबरीचा आता आपण १९७५ नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीचा एक नवा टप्पा म्हणून सविस्तर अभ्यास करु.

कागूद चे कथानक

शित्तूरच्या किसन बनसोडेने आपल्या गरजेपोटी आपली जमीन बाबूच्या आजोबाकडे गहाणवट ठेवली होती. त्याच्या बदली त्याने बाबूच्या आजोबाकडून हजाररुपये कर्ज शिवाय गरज पडेल त्यावेळी दोन पोती भात, आठ पायली जोंधळे, पोराला दोनदा मुंबईला जाताना हातउसने शंभर, चार पायली नाचणे, म्हातारीच्या दिवसाला शंभर असे वारंवार धान्य आणि पैशांच्या स्वरुपात कर्ज घेतलेले आहे.

कालांतराने किसन बनसोडे गहाणवट ठेवलेली जमीन सोडवून न घेता मरुन जातो. आणि बाबूचा आजोबाही मरुन जातो. वारसा हक्काने या गहाणवट जमीनीची मालकी बाबूचे वडील पांडू जाधव यांच्या कडे येते आणि किसनचा एकुलता एक मुलगा त्याने केलेल्या कर्जाचा धनी

होतो. पण हा मुलगाही मुंबईत नोकरी करत असताना अचानक मेल्यामुळे पांडू जाधव कसून खात असलेल्या गहाणवट शेतीचा-नागझरीचा प्रश्न निर्माण होतो.

गहाणवट शेतीचा एकुलता वारस वारल्यामुळे मालकी हक्काचा प्रश्न निर्माण होणे हेच या लघुकादंबरीचे कथाबीज आहे. नागझरी आता कोणाच्या ताब्यात जाणार असा प्रश्न निर्माण होतो. नागझरीवर हक्क सांगण्यासाठी एका बाजूने पांडू बनसोडे, कैलास बनसोडे हे किसनचे चुलत चुलते - पुतणे पुढे सरसावतात तर दुसऱ्या बाजूने किसन बनसोडेच्या तीन विवाहीत मुली व त्यांचे नवरे म्हणजे किसनचे जावई हक्क सांगू लागतात. नागझरी मात्र गहाणखतानुसार पांडू जाधवच्या ताब्यात आहे. असा तिहेरी पेच-प्रसंग निर्माण झालेला आहे.

असा हा तिहेरी पेच ग्रामीण ढंगात कसा सुटत जातो याचे तपशीलवार चित्रण या लघुकादंबरीत येते. जमीनीच्या खरेदी खताला ग्रामीण भाषेत " कागूद " करणे असा शब्द वापरला जातो. हा शब्द लेखक आनंद पाटील यांनी कादंबरीसाठी शिर्षक म्हणून वापरुन औचित्य दाखवले आहे. प्रस्तुत शीर्षक अत्यंत चपखल ठरते.

कादंबरीचा नायक " बाबू " हा नागझरीचा पेच सोडवतो नागझरीची रजिस्ट्री करण्यात त्याचाच पुढाकार आहे. याच्यासाठी त्याला खूप झगडावे लागते. अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यातील प्रमुख अडचण म्हणजे पैशाची. बाबूच्या आबाची म्हणजे पांडू जाधवची परिस्थिती बेताची आहे. जमीन खरेदी करायची तर पैशाची गरज असते. हा पैसा मिळवण्यासाठी बाबू सेक्रेटरीला भेटून भूबँकेचे कर्ज काढतो. काही हातउसने पैसे मिळवतो. आजोबांची आठवण म्हणून दिमाखान मिरवणारी

बैलजोडी त्याला बाजारात न्यावी लागते. अशा अनेक खटपटी करून बाबू पैसा जमवतो आणि नागझरीची " रजिस्ट्री ( कागूद ) करून घेतो.

या कादंबरीच्या संदर्भात डॉ.र.ना. ठाकूर लिहिताता " एखादे शेत खरेदी करताना आणि त्याचे खरेदीखत करून घेताना शेतक-यांना किती अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते याचे वास्तवपूर्ण चित्र " कागूद " मध्ये आले आहे. घटना नित्याची आणि साधीच परंतु ग्रामीण माणसाचे व त्याच्या जीवनाचे अस्सल दर्शन घडवून जाते"[१] खरोखरच या कादंबरीचे कथानक अत्यंत साधे आहे. पण निव्वळ व्यक्तीच्या बेरकी स्वभावामुळे ते गुंतागुंतीचे बनलेले दिसते. म्हणूनच आनंद पाटील यांचीही लघुकादंबरी घटना प्रधान नसून व्यक्तीदर्शन प्रधान आहे. असे म्हणावेसे वाटते. ग्रामीण माणसाच्या वृत्तीचे तपशील-वार चित्रण करणा-या लेखकाचे कौशल्य अद्वितीय आहे.

या लघुकादंबरीतील सर्व माणसे कमी-अधिक प्रमाणात बेरकी आहेत. प्रत्येकजण एकमेकाच्या वागण्या-बोलण्यातील खूट काढण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येक व्यक्ती प्रत्येक व्यक्तिकडे तिरकस चौकसपणे पाहते . या कादंबरी बद्दल वसंत आबाजी डहाके लिहितात, " कागूद " ला रूढ अर्थाने कथा नाही. गहाण पडलेले शेत विकत घेणे ही मध्यवर्ती घटना परंतु खेड्यातल्या जगण्याचा झगडा विविध स्तरांवर प्रत्ययास येतो"[२] आणि खरोखरच या कादंबरीतून गुंतागुंतीच्या पात्रचित्रणातून स्वभाव वैशिष्ट्यातून खेड्यातील जगण्याचा विविध स्तरांवरील झगडा प्रत्ययास येतो. हे सर्व एका समर्थ भाषेत लेखक आनंद पाटील मांडतात. त्यामुळे ही लघुकादंबरी उत्कृष्ट कलाकृती ठरते.

व्यक्तिचित्रण

बाबू

" बाबू " हा " कागूद " या लघुकादंबरीचा नायक आहे. कादंबरीतल्या सर्व घटना त्याच्या साक्षिने घडतात. तोच या कथेत मध्यवर्ती आहे. जमिनीच्या खरेदी खताचे काम त्याच्यामुळे अडून राहिलेले असते. बाबूचे आई-वडील, चुलता-चुलती हे अडाणी असल्याने आणि इतर भावंडे लहान असल्यामुळे बाबूच्या कुटुंबाला बाबूची खूप गरज आहे. त्याने भाग घेतल्याशिवाय वादाच्या भोव-यात सापडलेल्या नागझरीचे खरेदीखत होणार नाही असे त्यांना वाटते. म्हणून त्याची आई आणि आबा त्याला खूप कळकळीची पत्र टाकता असतात.

पण बाबूची मात्र आपल्या गावाकडे किंवा घराकडे परत येण्याची इच्छा नाही. तो साता-याच्या रयत शिक्षण संस्थेत कमवा व शिका योजनांतर्गत काम करुन आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी धडपडत आहे. त्याला शिकून खूप मोठे व्हावयाचे आहे. त्याच्यासमोर संस्थेत शिकून मोठ्या झालेल्या व्यक्तींचे आदर्श आहेत. आपला मित्र " रामू " याला आपले ध्येय सांगताना तो म्हणतो " तुला खरं सांगू रामभाऊ पदवी पदरात पडल्याशिवाय मला असल्या कटकटीत अडकून पडायचं नाही. आमच्या संस्थेतून घरादाराव पाणी सोडून परदेशी शिक्षणासाठी गेलेली माणसं आहेत"[३] बाबूला आपल्या शिक्षणाच्या आड कोणी येऊ नये असे मनापासून वाटते. आपण गावी गेलो तर कदाचित घरचे आपल्याला पुन्हा बाहेर सोडणार नाहीत. आपले शिक्षण अपूर्ण राहिल अशी त्याला भीती वाटते.

बाबूला आपल्या आबांची जास्त भीती वाटते. कारण बाबूने घर सोडून शिक्षण घेणे त्यांना अजिबात पसंत नाही. त्यांची

इच्छा अशी आहे की बाबूने कुठेतरी नोकरी करून चार नोटा घरात आणून द्याव्या आणि आपल्या संसाराला मदत करावी. आणि थोडा फार शिकलाच आहे तर आणखी शिकण्याच्या नादी न लागता मास्तर किंवा तलाठी व्हावे आणि गावावर राज्य करावे नागझरीसारख्या दहा जमिनी वडाव्या.

बाबूला गावच्या राडीत रहायचं नाही. त्याला गावचे तोंडसुध्दा पहायची इच्छा नाही. शिक्षण पूर्ण करून प्रोफेसर किंवा बॅरिस्टर व्हायची त्याची इच्छा आहे. कॉलेजला उन्हाळी सुट्टी लागलेली असते तरीही तो वसतिगृहात श्रमयोजनेत काम करत राहतो पण एक दिवस तो आपल्या आई वडिलांच्या कळकळीच्या पत्रांना बळी पडून गावी परततो.

बाबूला गावाबद्दल खूप तिरस्कार वाटतो. तो जेव्हा गावात प्रवेश करत असतो त्यावेळी त्याचा मित्र रामू त्याला हटकतो. तेव्हा तो म्हणतो, " उनानं झीट काडलीया, त्यातनं तुमचा रस्ता घोड्याच्या पोटचा या उद्गारात तो आपल्याच गावाला आपले मानायला तयार नाही. इथे तो " तुमचा रस्ता असा शब्द वापरतो.

बाबूला शिक्षणाची खूप गोडी लागली आहे. त्याला आपल्या घरातील सर्व भावंडानी आपल्यासारखेच खूप शिकावे असे वाटते. तो घरात आल्यावर भावंडाची चौकशी करताना प्रथम त्यांच्या शिक्षणाची चौकशी करतो. आजाली तो विचारतो, " शिवा, नामा, सखाराम, तारु समदी शाळला जातात ना आजी"[४] पण आजी म्हणते " समद्यांनी शाळा शिकाय आपून वाण्याबामणाचं न्हाई".[५] बाबूची मधील बहिण " तारु " हिची आबांनी शाळा बंद केलेली असते. हा आपल्या शिक्षणाचा परिणाम पाहून त्याला अपराध्यासारखे वाटू लागते. या विचाराने अस्वस्थ होऊन तो वाचण्यासाठी उघडलेल्या गॉल्सवर्दीच्या कादंबरीची पाने उलटवत राहतो. गावाला येताना सुध्दा वाचण्यासाठी बॅगेतून आणलेली कादंबरी हे त्याच्या शिक्षणाच्या ओढीचेच प्रतिक आहे.

तो जरी सातारा-यासारख्या शहरात शिकत असला तरी त्याच्यावरील खेड्यातील संस्कार अजून पुरेसे पुसले गेलेले नाहीत· त्याच्या बोलण्यात अजून खेड्याचे वळण आहे· त्याची पुरेपूर शहरी होण्याची धडपड चालू आहे· आपले सुशिक्षितपण दिसावे म्हणून तो वकिलाजवळ बँकेतल्या भोसलेसाहेबांजवळ सुशिक्षित वागण्या बोलण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. त्यांच्याशी इंग्रजी बोलण्याचा त्याचा प्रयत्न सुद्धा ग्रामीण संस्कारातून बाहेर पडण्याच्या प्रयत्नाचा भाग आहे·

बाबू हा गावातील होऊ घातलेला पहिला ग्रज्युएट पदवीधर आहे· हा पदवीधर गावातल्या लोकांना म्हणजे सेक्रेटरी, रामू, आबा, नाना यांना जरी भोळा " नामदेवम्हाराज " वाटत असला तरी तो तितका भोळसट नाही· तो धूर्त आहे· गावात प्रवेश करताना गावकऱ्यांच्या चौकशांना चुकवण्यासाठी गावकरी शिवारातून बाहेर पडण्याअगोदर तो थळाच्या पायवाटेने घराकडे वळतो या चौकशातूनच बरेचसे राजकारण फिरत असते याची त्याला कल्पना आहे·

गोडे वकिलाला भेटल्या नंतर आबा त्याला म्हणतो, बाबू लई सोक पडलाय चल सोडा पिवूया त्यावर· बाबू म्हणतो " आता नको आबा, अगोदर आपण भिंगार्डे वकिलांना भेटू, नोटीस त्यांनी धाडलीया काय म्हंत्यात बगू तरी"६

बाबू भिंगार्डे वकिलांना भेटून त्यांच्याजवळ नम्रतेचा आव आणून तो त्यांची चाल आजमावण्याचा प्रयत्न करतो· त्यांचा सल्ला घेवून त्यांची बोटे त्यांच्याच डोळ्यात घालण्याचा त्याचा डाव आहे· तो आबाला म्हणतो, " आबा असं बेसावध ठेवूनच दणाका द्यायचा"७ आणि तसाच पुढे म्हणतो, " चला ती रत्नागिरी-कोल्हापूर गाडी आलीया बघा लवकर परतू उजेडा बरोबर"८ इथे आबा एस·टी·ने गावाला जाण्याच्या

मताविरुद्द आहे· पण अगोदर आबा सोडा पिवूया म्हटले आहेत आणि बाबू न को म्हणालेला आहे· आबांच्या त्या शब्दाचा/उदारपणाचा बाबू अप्रत्यक्षपणे असा उपयोग करुन घेतो· पुढे निवेदक सांगतो, " सोडा लेमनचे पैसे वाचवून एस·टी·ने जायची कल्पना बाबूनं लढवली· कारण गाडी गेल्यावर आबांनं त्याला सहा मैल फरपटत न्यायला कमी केलं नसतं" ९ असा बाबू धूर्त आणि चाणाक्ष आहे·

सेक्रेटरीने बाबूचा धूर्त स्वभाव ओळखला आहे· तो बाबूला म्हणतो, " तुझ्या आबा-नाण्यानं येवढ्या लटपटी जमल्या नसत्या· काय म्हण तू दिसतुयास त्येवढा भोळा न्हाईस· तुज्याकडं बगून मी हया भानगडीत पडलो".१०

शेवटी गावकरी मात्र त्याला गोंधळून टाकतात जेणे करुन तो भोळा वाटावा· कारण अडाणी आबा सेक्रेटरीला पूर्ण ओळखून आहे· पण बाबूला मात्र तो समजलेला नाही· सेक्रेटरी त्याला कधी फसवतो ते त्याला समजत नाही· आबा त्याची फसवणूक लक्षात आणून देतो· तर बांबूळकर ड्रायवर ही त्याला फसवतो हे सेक्रेटरी त्यांच्या लक्षात आणून देतो· त्यामुळे बाबू भोळा वाटू लागतो· पण अर्थात तसा तो नाही· फक्त गावकऱ्यांपेक्षा कमी धूर्त आहे इतकेच·

बाबू जसा धूर्त आणि चाणाक्ष आहे तसाच तो व्यवहारी सुद्दा आहे· संभाषण चतुर आहे· भरकटलेले संवाद सावरण्याचे त्याला चांगले माहीत आहे· त्यामुळे कित्येकदा भांडणात रुपांतर होणारी संभाषणे आवरती घेवून त्यांना तो योग्य वळण देताना दिसतो· इथे त्याचा खरा सुशिक्षितपणा दिसून येतो· बाबूचा आबा स्वभावाने तिरसट आहे· त्याच्याशी बोलायचे म्हणजे भांडणे ही व्हायचीच पण बाबू समजदार असल्याने आबाचे घसरलेले प्रत्येक संवाद तो सावरुन धरतो आणि संभाषण तुटू देत नाही·

आबाने वाचायला दिलेली नोटीस वाचून बाबू आधार देण्या साठी आबाला म्हणतो. घाबरण्याचे कारण नाही. आपण वकिलाकडे जाऊन खात्री करु, तेव्हा आबा तिरसटपणे म्हणतो " त्येला पैका पडतो बाळा, चिचुकं चालत असतं तर तू सांगाड्ची वाट बंगिटली नसती" ११

बाबू एखाद्याची समजूत घालण्यात पटाईत आहे. त्याचा नाना बैल विकून नागझरी खरेदी करण्या विरुद्ध मताचा आहे. तो बैलांना हात लावू द्यायला तयार नाही. पण बाबू त्याची व्यवस्थित समजूत घालतो. परिणामी जमिनीच्या वादातून आबाशी एकेरीवर आलेला नाना, बाबू जवळ मात्र बैलं विकण्यास सम्मती देतो. बाबू त्याला म्हणतो, " आपणच भांडत बसलो तर माकडाच्या गोष्टीतल्या लोण्याच्या गोळ्यागत हुईल "१२

शिक्षणासाठी घर सोडून " बाबू " साता-याला राहात असला तरी तो आपल्या आजी आणि भावंडांना विसरलेला नाही. कारण त्याचे आपल्या आजी आणि भावंडावर खूप प्रेम आहे. तो आजीची जी गमंत करतो ते तिच्यावरील प्रेमापोटी. आजीने लहानपणी सांगितलेल्या गोष्टींचा त्यांच्यावर संस्कार झालेला आहे. त्याचा गोष्टीवेल्हाळ स्वभाव आजीच्या गोष्टीमुळेच बनलेला आहे. आणि त्याच्या या स्वभावामुळेच तो अनेकांना आपल्याकडे आकर्षित करुन घेतो. लहान भावंडाच्या मध्ये सुध्दा तो प्रिय आहे. याला कारण त्याचा गप्पिष्ट स्वभाव.

असा हा बाबू या कामासाठी गावी आलेला आहे. ते काम तो पूर्ण करतो. प्रत्येक कामामध्ये तो यशस्वी होतो. तो जिद्दी आहे. शिवाय त्याचा स्वभाव उमदा आहे. ज्या उमदेपणाने तो स्तुती झेलतो त्याच उमदेपणाने तो आपले दुःखही झेलतो. त्याच्या यशाचे हेच गमक आहे. लेखक आनंद पाटील यांनी सुशिक्षित ग्रामीण तरुणाची म्हणजे बाबूची मानसिक कसरत अत्यंत यशस्वीपणे मांडलेली आहे.

आबा

" कागद " या लघुकादंबरीतील " आबा" ही व्यक्तिरेखा सेक्रेटरी व कादंबरीतील इतर व्यक्तिइतकीच जीवंत आणि वास्तव आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्याचा विक्षिप्त स्वभाव. खरे पाहता आबाला चिडखोर म्हणणे जास्त योग्य ठरेल. कारण त्याचे तिरकस बोलणे भांडणास पोषक ठरुन कुटुंबियांशी त्याचे सतत खटके उडत असल्याचे आढळते. यामुळे त्याचा स्वभाव भांडखोर असल्याचे मनावर ठसते.

" आबा " हा कुटुंबप्रमुख आहे. आणि त्याच्या चिडखोर स्वभावामुळे त्याच्या कुटुंबातील माणसे त्याला सतत घाबरुन असतात. त्याच्या अशा स्वभावामुळे अनेक संघर्ष प्रसंग निर्माण झालेले आहेत. त्याला साधे-सरळ निर्मळ मनाने बोलता येत नाही. त्याचे बोलणे हे इतरांना डोचणारे, लचके तोडणारे आहे. वड्याचे तेल वांग्यावर काढण्याची त्याला सवय आहे.

नागझरीच्या शेताची जी भानगड उद्भवलेली आहे. त्यामुळे आबा वैतागून गेला आहे. शेतकऱ्याच्या जीवनातील शेतीचे महत्त्व पाहता किंवा शेतकऱ्याचे शेतावरील जीवापाड प्रेम लक्षात घेता त्याची झालेली ही अवस्था साहजिक आहे. आपला मुलगा बाबू आपल्या " आईकटीच्या " बाहेर गेल्यामुळेही तो वैतागलेला आहे. आपल्या मुलाचे-बाबूचे जास्त शिकणे त्याला पसंत नाही. जर बाबू त्याच्या सांगण्याप्रमाणे शाळामास्तर अथवा तलाठी झाला असता तर त्याला नागझरी सारख्या अनेक जमिनी हडपता आल्या असत्या असे त्याला वारंवार वाटते. पण बाबूला मात्र आबाची ही इच्छा मान्य नाही, आबा बाबूवर का चवताळायचा ? याचे कारण सांगताना निवेदक म्हणतो, " आबांच्या मतानं बाबू मास्तर, तलाठ्यासारख्या गावचा मालक व्हायला मागत नव्हता, लई शिकून मोठ व्हायचं हाच त्याचा हेका. पोरपिसर, बॅलिस्टर, फिलिस्टर ही भानगडे आबाच्या टाळक्यात

घुसत नव्हती.......त्याला वाटायचं पोरानं म्हैन्याला चार नोटा घरात आणून द्याव्या, मग नोकरी कसली का असेना, पोरगा आईकटीच्या बोहर गेला म्हणून ठूस झालं की चवताळायचा " [13]

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षणाचा प्रसार जोमाने होऊ लागला. नव्या पिढीला शिक्षणाची ओढ लागू लागली. शिक्षणाचे तिला महत्त्व समजू लागले. पण मानसिक गुलामगिरीतून हळू हळू बाहेर पडणाऱ्या जुन्या पिढीला मात्र अजून शिक्षणाचे महत्त्व पटले नव्हते. खेड्यातल्या जुन्या पिढीला तर जराही विश्वास नव्हती की आपली मुले शिकून कोणी मोठी होऊ शकतील. अशा निराशावादी पिढीचे नेतृत्व आबा करतो. त्यामुळे त्याला बाबूचे शिक्षण म्हणजे केवळ फालतुपणा वाटतो. तो फुकट पैसा खर्च करत आहे. असेही त्याला वाटते. बाबूच्या वयाच्या पोरांनी कमवायला सुरुवात केली असल्याने आबाला बाबूचे शिक्षण खटकते. नागझरीचे खरेदीखत बाबूच्या असहकार्यामुळेच अडचणीत सापडले आहे असे त्याला वारंवार वाटते.

पोस्टमन नोटीस पोहोचल्या बद्दल आबाचा " अंगठा " ठसवून घेतो पण त्यामुळे आबा खूप घाबरुन जातो. त्या निशाणीच्या आधारे आता आपली नागझरी आपल्याकडून बळकावली जाणार असेच त्याला वाटते. तो बाबूला म्हणतो, " आरं पर माजा अंगठा गुतलाय त्या पोचपावतीवर पोस्टमनानं न्हेलाय न्हवं" [14] या आबाच्या बोलण्यावरुन त्याचे घोर अडाणी पण स्पष्ट होते.

पण शिक्षणाने म्हणजे लिहिण्या वाचण्यात आबा जरी अडाणी असला तरी माणसाची त्याला पारख आहे. नागझरीचे खरेदी खत करण्याच्या वेळी तालुक्याच्या गावी तो बाबूला बाजूला घेवून हळूच सूचना करतो. तो म्हणतो, " सेक्रेटरी महा बनेल हाय, पैशा अडक्यात चकवील. चांगल ध्यान ठेवून ऱ्हा. त्येची पाठ सोडू नगं, खर्चाची नोंद लगीच करुन ठेव. न्हाईतर भांबावून जाशील बग" [15]

आबाचे बोलणे म्हणजे सदा काटयावरचे, सरळ बोलणे त्याच्या स्वभावात नाही. त्यातल्या-त्यात घरच्या माणसांबरोबर तो चिडून बोलताना दिसतो. पोस्टमन देवून गेलेला नोटीस बाबूला दाखवताना ती त्याच्या हातात न ठेवता लांबूनच त्याच्या अंगावर फेकतो. ती एक साधी नोटीस आहे. घाबरायचे काही कारण नाही असे बाबू त्याला समजावून सांगतो तेव्हा ते गप्प ऐकूण घेण्याऐवजी तो म्हणतो, " आता तू पडलास बालिस्टर.आमाला कळत्यात ढेकळं, हयेला उत्तर सांग " १६ आपल्या नव-याचे असे वाकडे बोलणे सारजाला म्हणजे बाबूच्या आईला पसंत नाही. बाबूची आजी जेव्हा आबाला म्हणते, " आरं, प्वॅार सरळ इच्यारतया नि तू का वाकड्यात शिरतूयास ?"१७ ही संधी पकडून बाबूची आई म्हणते, " जल्माची खोड हाय ती मामी"१८ तेव्हा आबा तिच्यावरही चिडतो. घरच्यांनी कोणी चांगले चार शब्द सांगितलेले त्याला आवडत नाही. आपलाच भाऊ नाना आपल्या विरोधात आहे असे त्याला वाटते.

नानाचं गावातल्या गुरुंनी कान फुंकल्यात असा त्यास संशय आहे. आणि म्हणून नाना आपल्याला या खरेदीत साथ देत नाही असे त्याला वाटते. त्यामुळे नानाची आणि आबाची सारखी खडाजंगी उडते. संधी सापडेल तिथे आबा नानाला डिवचून बोलतो. बाबू बरोबर बोलताना तो असाच नानाला टोला हाणतो म्हणतो," पर हितं आमचं सारंच खुडाकल्यां गावातलं बनचुक्याचं, लुंगसुंग आमाला घाला लागल तरं कराइच काय ? "१९

आपल्या भावाशी त्याचा कधी सुसंवाद नाही. कायमपणे त्याला टोचून बोलणे आणि त्यानंतर भांडणे अशा प्रकारेच तो नानाशी बोलतो. आबाच्या अशा डिवचण्याने वैतागून नाना म्हणतो, " बाबू तुमीच बापल्याचा काडा तोडगा. आमचं गाव हाय लई खोलाचं. आपल्याबशी नाही दिडकी. कज्जेखेळत बसण्यापरास उद्या पैका आसल्याव शेताला काय गाव कुडल्यां ? " २० नानाचे हे बोलणे वैतागून जरी असले तरी त्याच्या बोलण्यात संयम आहे. याउलट आबा मात्र यवढया तेवढया गोष्टीवर तरबत्तर होणारा आहे. तो यावर लगेच म्हणतो, " आगा ये गबरु बास कर तुजं

श्यानपन तृ जा राकनवंर आमाला न्वाई हये श्यात सोडाईचं" [२१]
यावर भांडण वाढतच जाते. एकूण आबाचे बोलणे हे भांडणे वाढविणारे आहे.

आबाचा स्वभाव फटकळ आहे. नागझरी शेत खरेदीसाठी आबा गाडी बैलं विकायची म्हणतो तेव्हा बाबू म्हणतो " गाडी-बैलाचं नाव काढलं तर नाना गाळ्गं फोडून मागील त्यावर आबा फटकन म्हणतो " " " -हावूंदे येगळा -हाईला तर. त्येचं गावातल्या गुरूंनी कान फुकल्यात. आईच्या पोटातंन येगळं आलुया, क्वातरी येगळं हुयाचंच " [२२] असा कंडका तो पाडतो. त्यावर बाबू तिरकसपणे म्हणतो, " आता तुम्ही तोडून बोलणारच. तुमची मुलं मोठी झाली. त्याला जाऊ दे वा-यावर" [२३]
त्यावर पुन्हा फटकून आबा म्हणतो, " ये मला श्याणपणा शिकवू नग, सरळ वाटनं गोडीत जावून येवू या" [२४] वरील संभाषणावरून आबाचे व्यक्तिमत्व एक कल्ली आणि तिरसट असल्याचे जाणवत राहते.

बाबू च्या शिक्षणाबद्दल त्याला अतोनात तिरस्कार आहे. बाबूचे शिक्षण हे पूर्णतः त्याच्या मनाविरुद्द आहे. पण असे असूनही बाबू घर सोडून गेल्यामुळे तो जळफळाटा व्यतिरिक्त काहीच करू शकत नाही. तो बाबूला सतत वाकड्या भाषेत बोलून त्यानं नोकरी करावी असू चार नोटा घरात आणून द्याव्यात हे सुचवतो.

तालुक्याला चालत निघालेल्या आबाला आपला मुलगा स्वय मोडल्यामुळे डोंगर चढताना दमलेला आहे. याचे काही वाटत नाही. उलट त्याचा राग त्याला येतो. " हे कार्ट जलमभर आपली सत्व परीक्षा घेणार" [२५]
शिक्षणाचं खूळ त्यानं डोक्यात घेतल्यामुळेच ते कामातून गेले आहे, असे त्याला वाटते. डोंगर चढताना थकणारा हा गडी शिकून काय धन पाडणार ? हा भाबडा प्रश्नही त्याला भेडसावतो. नागझरीसारख्या दहा जमिनी हडपण्यासाठी किंवा मळा पिकवण्यासाठी बाबू साथ देत नसल्याने त्याला त्याचा राग वाटतो, हा राग तो पदोपदी व्यक्त करतो. बाबूने शिक्षण सोडून नोकरी धरावी असे त्याला अजूनही वाटते. आणि ही त्याची इच्छा तो आपल्या बोलण्यातून सुचवत राहतो. वकिल जेव्हा आबाला धीर देण्यासाठी

म्हणातो पांडुरंग असला मुलगा आधार द्यायला असल्यावर घाबरता कशाला ?" यावर आबा नाराजीनं म्हणातो " त्ये समदं खरं हाय, पर पैशाकंड बाजू जरा पडाक हाय" [२६] इथ आबाला पैशाची कमतरता सुचवायची आहेच आणि बाबूचानिरूपयोगीपणा ही त्याला निदर्शनास आणून द्यावयाचा आहे.

बाबू ज्यावेळी सरकारी कर्ज काढायचे बोलतो तेव्हा आबा म्हणातो, " सरकारी देणं घाल माझ्या गळ्यात नि तू बस उंडगा हिंडत" [२७] पुढे तो बाबूला कुठेतरी नोकरी धरण्याचा किंवा कोणात्यातरी शिक्षकांकडून हजारबाराशे उसने आणाण्याचे सुचवतो. एकूण बाबू म्हणाजे त्याला बेजबाबदार जू टाकणा-या कामचुकार बैलासारखा वाटतो. त्याला मार्गाला लावण्यासाठी तो अनेक प्रयत्न करत राहतो.

आबाचे एक वैशिष्टय असे की तो घरात कितीही चिडत असला तरी घराबाहेर मात्र लोकांशी तो सामंजस्याने वागतो. घरातही कधी-कधी तो समंजसपणे वागतो. साठेखत करताना किंवा कागद ( रजिस्ट्री ) करताना त्याची भूमिका नरमाईची आहे. गोड्या वकिलाला भेटून परत येताना तो बाबूला सोडा प्यायला जावू म्हणातो. कर्ज मिळविण्यासाठी कोल्हापूरला बँकेत गेलेला बाबू घरी परतायला उशीर करतो तेव्हा आबा चिंताक्रांत होतो. कारणा आड वाटेला वाटमारी होते याची त्याला जाणीव आहे. अशा परिस्थितीमुळे अनेक वेळा त्याने उशीर करणा-या घरच्या लोकांना खडसावलेले आहे. इथे आबाच्या आंतील प्रेमळ बाप दिसतो.

तो कितीही फटकळ स्वभावाचा असला आणि इतरांना तोडून बोलत असला तरी त्याच्या मनात कोणाबद्दल दुष्टावा नाही. बाबूला आबाचे हे चांगुलपणा माहित आहे. म्हणून तो आबाचे बोलणे जास्त मनावर घेत नाही. नानाची समजूत काढताना आणि आबाची बाजू समजावून सांगताना बाबू म्हणातो " आबा खोटा, कुजका, बुडव्या, नादिष्ट हाय का ? " [२८] अनेक जबाबदा-यामुळे दबून गेलेला आबा जरी वैतागल्यासारखा करत असला तरी प्रत्यक्षात मात्र तो प्रामाणिक बाप आणि शेतकरी आहे.

कधी तो बाबूला आणि त्याच्या सुशिक्षितपणाला हिणावतो. पण त्यामागे बाबूला शहाणपण शिकवण्याची त्याची तळमळ आहे. सेक्रेटरीने तुला फसवला हे सांगताना तो बाबूला म्हणतो, " काय तुज्या डिग्र्यांचा उपेग रं कुटल्याबी कागदाला पंदरा रुपये लिवणावळ पडती. माजी सकाळपसनं तुमा दोगावर घारीवाणी नदार हाय म्हटलं, शिकल्याल्या पोराचं पाणी तरी बगू " [२९] असे कुत्सितपणे तो म्हणाला तरी लगेच पुढे तो म्हणतो, " तस न्हवं गावातल्या मान्सांची चव घ्येनात घे. मी काय तुला हिणावत न्हाई. आमी आडाण्यानी कसं वागावं त्ये ठरीव". [३०] म्हणजे काही ठिकाणी तो धोरणाने बाबूला बोलतो.

कागूद झाल्यावर आपल्या मनासारखे झाल्याचा आनंद त्याला होतो. त्याच्या मनाविरुद्ध काही घडले की रागवण्याचा त्याचा स्वभाव आहे. नागझरीचा कागद झाल्यानंतर आबा श्रमपरिहार म्हणून जेवणाची पार्टी देतो. तेव्हा आई आबाला नैवेद्य दाखवून येण्यास सांगते. त्यावेळी आबा काहीही उलट न बोलता बायकोने सांगितलेले काम ऐकतो. त्यावरील निवेदकाचे भाष्य पहा, " काही न बोलता आबा निवद घेवून बाहेर गेला. आईनं सांगितलेलं काम गप्पगुमान ऐकताना बाबूनं आबाला पहिल्यांदांच पाहिलं" [३१]

आबाचे संपूर्ण व्यक्तिचित्र स्वतंत्र काढले असता. त्याच्या स्वभावाचे वैशिष्टय लक्षात येते की तो पैशाला जास्त महत्व देतो. आबा जिथे-जिथे चिडलेला आहे तिथे-तिथे कारणांचा शोध घेतला असता पैसा कारणीभूत असल्याचे लक्षात येते. बाबूवर त्याचा राग आहे कारण तो नोकरी करून चार नोटा घरात आणून देत नाही. नानावर तो चिडतो कारण तो बैलजोडी विकू द्यायला तयार नाही. पुढे तो ती बैलजोडीही विकून टाकू असे म्हणतो कारण त्याला पैशाची गरज आहे. त्यामुळे भाऊ वेगळा राहिला तरी त्याची पर्वा त्याला नाही, बाबूच्या आईला-आपल्या बायकोला तो एकवेळ " ये रानी तू आलीस म्हायारासनं ढीगबर पैका घेवून तिची भना फुकट थोरवी गाजवायची सवंच" [३२] असे बोलतो. सेक्रेटरी हा आबाचा विश्वासा-

तील दोस्त पण पैशापायी तो त्याच्याकडेही तिरकसपणे पाहतो· कागद करायच्या वेळी बाबूला बाजूला ओढून घेऊन आगाऊ सूचना देतो- " सेक्रेटरी महाबनेल हाय, पैशाअडक्यात चकवील, चांगलं ध्यान ठेवून -हा· त्येची पाठ सोडू नगं· खर्चाची नोंद लगिच करून ठेव न्हाईतर भोबावून जाशील बग"[१३] या त्याच्या उद्‌गारावरून तो पैशाबाबत किती जागृत आहे हे लक्षात येते·

नागझरीची " रजिस्ट्री " करण्याचे मोठे काम बाबूने पार पाडलेले आहे· त्यामुळे एखादया क्षुल्लक चुकीकडे दुर्लक्ष करण्यास काहीच हरकत नव्हती· पण ती क्षुल्लक चूक पैशासंबंधीची असल्याने आबा बाबूची खरडपट्टी काढतो· " कागद " करण्याच्या व्यवहारात काही पैसे बांबुडकर-ड्रायव्हरकडे जास्त जातात· या चूकी बद्दल सेक्रेटरीचा आणि बाबूचा गमतीचा संवाद चाललेला असतो, सेक्रेटरी म्हणातो, " सगळं गणित मांडून करारात आडिकलाता मी त्येला, तू केलास बरम घोटाळा· हातचा बकरा सोडलास"[१४] यावर बाबू झालेल्या क्षुल्लक गोष्टीवर विचार नको म्हणून म्हणातो, " जाउ दे तात्या हराळाचा पैसा काय करायचा ? तो वाढील जेवायला त्यांच्या माणसांना"[१५] पण अनपेक्षितपणे आबा बाबूवर ओरडतो त्याची खरडपट्टी काढतो, " हये जाऊ दे, त्ये जाउ दे, स्वोता घाम गाळल्याशिवाय पैची किंमत कळणार न्हाई तुला लागलायवर अक्कल पाजळायला"[१६] या त्याच्या संतापामागे देखील पैसाच कारणीभूत असलेला दिसतो·

वरील उदाहरणांच्या आधारे " आबा " ही व्यक्ती पैशाला अधिक महत्त्व देणारी ठरते· तथापि एवढा एकच सिद्धांत मांडून थांबणे आबासाठी अन्यायकारक ठरेल· कारण तो ज्या पैशांसाठी एवढा आटापीटा करातो तो पैसा म्हणाजे शेताचे प्रतिक ठरते· आपल्या हातून एक-एक पै गमावणे म्हणाजे जणू नागझरीच हातून गमावणे असे त्याला वाटते· आणि कोणात्याही परिस्थितीत तो हातून नागझरी सोडण्यास तयार नाही· नागझरी त्याला त्याच्या प्राणापलिकडे पियु आहे· ती नावावर

करून घेण्यासाठी तो झगडत आहे. घरची बाहेरची माणसे त्याला नागझरीपुढे क्षुल्लक वाटतात. बाबूचा शहाणपणा आणि शिक्षण उपयोगाचे नाही तर पैसा ही गरज आहे. म्हणूनच तो बाबूला नोकरी करण्यासाठी आग्रह धरतो. बाबू तलाठी किंवा मास्तर झाला असता तर आबाला स्वर्ग भेटला असता. मास्तर होवून त्यानं " खोतागत" घर सांभाळत मळा पिकवला असता किंवा तलाठी झाला असता तर नागझरी सारख्या अनेक जमिनी हडपल्या असत्या. एकूण काय तर जमिनीवरील प्रेमच पहावयास मिळते. म्हणून आबाचे पैशावरील प्रेम हे शेतावरील प्रेमाचेच दुसरे रूप ठरते.

असा हा " आबा " " कागूद " या लघुकादंबरीतील एक वैशिष्टयपूर्ण पात्र ठरते. त्याच्या व्यक्तीमत्वास अनेक पैलू असलेले पहावयास मिळतात. आनंद पाटलांची"पात्रे " ही वैशिष्टयपूर्ण ठरतात याची कारणे पाहता लक्षात येते की ती अस्सल ग्रामीण जीवनातून अगदी थेट आहेत तशी कादंबरीत उतरतात. लेखक त्यात कोणतीही ढवळाढवळ करत नाही. यामुळे आनंद पाटील यांच्या कादंब-या वैशिष्टयपूर्ण ठरतात.

## सेक्रेटरी

दत्तू सेक्रेटरी हा पांडू जाधवचा म्हणजे बाबूच्या आबाच्या विश्वासाचा दोस्त, नागझरीचे खरेदीखत करण्यात त्याचा पुढाकार आहे. सेक्रेटरीचा बाबूवर फार लोभ आहे. बाबूची चिकाटीने शिक्षण घेण्याची जिद्द त्याला कारणीभूत आहे. आपल्या गावातील " शेतक-याचा मुलगा " " इंग्रजी " घेवून बी.ए. करत आहे याचा अभिमान त्याला बाबूबद्दल आहे

म्हणून सेक्रेटरी बाबूला वारंवार साहेब म्हणून हाक मारतो यावरून त्याचा बाबू बद्दलचा आदर दिसून येतो.

आपल्या पोरांनी, भावांनी सुद्दा बाबू सरखे जिद्दीने शिक्षण घ्यावे असे त्याला वाटते म्हणून त्याने त्यांना कोल्हापुरात शिक्षणासाठी ठेवले आहे. परंतु त्याचे भाउ शिक्षण घ्यायचे सोडून इतर धंदे करत असतात. याचा त्याला राग आहे. ही खंत बोलून दाखवताना तो म्हणतो, " बाबू तू कुठल्याच कामात हार जाणार न्हाईस, मला म्हाईत हाय " घोडं हाय, पर हारबरं न्हाईत" असं झाल्यं तुला. आमच्या गड्यास्नी लगी मस्ती आली बग. ज्येला फोजदार कराईचा म्हून कोल्हापूरला ठेवला त्यो महाद्वाराला फिरत बसला पोरीमार्ग, कायद्यासंग बेदा तयार करण्यासाठी दुस-याला मोती-बागच्या तालमीत घातला. त्योबी पालव्यागत लापटल्याला. आता पार काय उजेड पाडतया बगू " [३७]

या सेक्रेटरीची सुरुवातीला ओळख करून देताना निवेदक म्हणतो, " सेक्रेटरी औंबाघाटातल्या कुठल्या उजगावला नोकरीला होता, तो बहुदा आईतवार गाठून गावात हमखास मिळायचा. पण कधीकधी आठ पंधरा दिवसही गावातच तळ ठोकून असायचा. दोस्त म्हणून आबाचा सेक्रेटरीवर मोठ्ठा विश्वास होता. पण गावात या माणसाबद्दल ब-याच कंड्या पिकल्या होत्या एक नंबरचा गोडबोल्या सेक्रेटरी, कधी टांग वर करून कुणाच्या कानात मुतल त्ये सांगता यायचं नाही, असं बरीच लोकं बोलायची" [३८]

उत्तरार्धात ही कादंबरी सेक्रेटरीच्या भोवती फिरायला लागते. त्यामध्ये सेक्रेटरीचे वाक्चातुर्य, स्वभावातील बेरकीपणा, वाचकाच्या मनावर ठसायला लागतो आणि सेक्रेटरीचे पात्र अस्सल आणि जीवंत असल्याचे जाणवत राहते. सेक्रेटरी चुरचुरीत बोलणारा आहे. शिवाय लबाडीमुळे त्याच्या बोलण्याला जास्तच रंगत येते. बाबू त्याला भेटायला जातो तेव्हा तो म्हणतो, " बसा सायेब, कशी काय आठवण झाली गरीबाची" [३९] या संवादातील त्याने सायेब हे बाबूला लावलेलं विशेषण मनापासूनचे आहे पण पुढे तेच

" कशी काय आठवण झाली गरीबाची असे म्हणतो, यात त्याचा गमत्या आणि धूर्त स्वभाव दिसून येतो. सेक्रेटरीचा अनुभव आणि अधिकार यामुळे तो बाबूपेक्षा कितीतरी पटीने धूर्त आहे. शेवटी तो बाबूच्या खरेदिखतातून आपलेही खरेदीखत ओढून काढतो, हा त्याच्या स्वभावाचा एक कंगोरा आहे. बाबूला तो जवळचा वाटतो आणि तो ही त्याला तसे भासवतो. त्याप्रमाणे बाबूला मदत करतो. अधिकाराने बाबूला मदत करतो तेवढ्याच अधिकाराने बाबूला फसवण्याचा हक्क आहे असे समजून त्याला फसवतो. म्हणजे शंभर टक्के प्रामाणिक नसणे हे त्याचे जिवंतपण आहे. यामुळे तो जास्त लक्षात राहतो.

सेक्रेटरी कोर्ट-कज्ज्याच्या कामात मुरलेला आहे. त्याला अशा गोष्टीत प्रचंड आत्मविश्वास आहे. जेव्हा बाबू नागझरी आमची हाड काढणार असे म्हणतो, त्यावेळी सेक्रेटरी अत्यंत बेफिकिरीने म्हणतो, " हातूतिच्या असल्या फुसक्या गोष्टी तर हागता-हागता कराईच्या असतात बाबूराव"[४०]

बाबूच्या नागझरीचे खरेदीखत म्हणजे त्याला लग्नासारखे वाटते. म्हणून तो विनोदाने म्हणतो, " तीन चार महिन्यांची मुदत घालून किस्न्याच्या लेकीला आदुगर करारात बांदून घेऊ. मग तांदूळ टाकू सवडीनं "[४१] पण बाबूला प्रश्न पडतो तीन चार महिण्यांची मुदत जरी मागून घेतली तरी पैसा कुठून आणायचा ? पण इथेही सेक्रेटरी आत्मविश्वासाने बाबूला धीर देतो म्हणतो, " हये बग, तीन चार म्हैन्यात हिंकडची दुनिया तिकडं करू. आबाला पटवीन मी जरा दमानं"[४२] पुढे हाच सेक्रेटरी बँक अधिकाऱ्याच्या घरात जाण्याआगोरच बाबूला सांगतो, " मी कसा गुंडाळतो सायबाला नुस्ता बगीत बस. पईला हप्ता मिळणार ही काळ्या दगडावरची रेग समज"[४३]

सेक्रेटरीला आपल्या जिभेवर सुद्दा विश्वास आहे· एखाद्याला बोलण्यात आणणं सहज हरवू असे त्याला वाटते· गोगव्याला साठेखत करण्यासाठी जाताना साठेखताबद्दल चिंता करणाऱ्या आबा, गणपूअण्णाला तो म्हणतो " तुमी काळजी करू नका गा पहिल्या सलामीलाच डाबवरला कसा माती चारतो बगा" ४४

सेक्रेटरी बोलताना फार मोठ-मोठ्या बाता करतो बाबू ज्यावेळी त्याचा अंदाज घेण्यासाठी कर्ज देवून त्याच्या बदलात व्याजात आमचं दुसरं शेत करा असे म्हणतो तेव्हा तो फणकारकीने म्हणतो," बाबूराव येवडा इनामदार असतो तर गावात रोज एकाचं धोतर फेडलं असतं खुळ्या पायजे तर शेदीडशे येळला घालीन, तुज श्यात कराईला आमची अवलाद नमकहराम न्हाई· आरं, तुज्या बानं माज्या बैलगाडीचा कल धरल्याला कसा इसरंन् "४५ अशा पद्दतीने प्रसंगी उपकार-अपकाराच्या गोष्टी करणारा सेक्रेटरी शेवटी थोडा का होईना बाबूला फसवतो· म्हणूनच सगळे गाव त्याला " कधी टांग वर करून कुत्र्याच्या कानात मुतल त्ये सांगता यायचं नाही असे म्हणते·

कोर्ट-कज्ज्यातील त्याला जशी माहिती आहे तशीच त्याला बँक आणि कर्ज प्रकरणे यांची सुद्दा इत्थंभूत माहिती आहे· बँकेचे कर्ज काढण्या-साठी काय-काय करावे लागते याची तो पटापट माहिती सांगतो, " तू लँड डेव्हलमेंट बँकेचा अर्ज आणून ठेव· तुमच नि एकदोन जामिनाच सातबारा आणि आठ " अ " चं खात उतारं काढून त्यारीत -हा"४६ अशा सूचना बँकप्रकरणासाठी बाबूला देतो·

सेक्रेटरीला पुढारीपणाची खूप हौस आहे· आपल्या शिवाय गावातले पान हलू नये· आपल्या बोटाच्या तालावर गावाने नाचले पाहिजे आणि आपल्यापुढे " गाईगत " गावक-यांनी नमून राहीले पाहिजे अशी त्याची मनोमन इच्छा आहे· बाबू त्याला जवळचा वाटतो· म्हणून आपल्या

मनची गोष्ट सांगताना त्याला म्हणतो, " आरं तुज्या सारक्यानं समदं गाव बोटाव नाचवाय पायजे· देवानं चांगल डोकं दिलय, हुकी मामलेदार, कलेक्टर, सी·वो· असा बडा सायेब, मग बग तुज्या म्होरं गईगत नमत्याल कशी ती" ४७ सेक्रेटरीचे तत्वज्ञान त्याच्या वरील आंतरिक इच्छेला पूरकच आहे· हे जीवनात वापरायचे तत्वज्ञान बाबूला सांगताना तो म्हणतो" तू कसल्याबी नोकरीला लाग, पर एक ध्यानात ठेव, ही ख-याची दुनिया न्हाय· कुनासाठी कोन फुकट राबत न्हाय· वाटंल त्ये करून आपला हाच्या कुठल्याबी माणासावर शिल्लक ठेवाइचा"४८ या उद्गारावरून सेक्रेटरीचे तत्वज्ञान हे जगाचा अनुभव घेऊनच बनलेले आहे असे दिसते· कारण तो स्पष्टपणे म्हणतो, " ही ख-याची दुनिय न्हाय" पुढे आपल्या तोंडाने तो स्वतःच्या नीतीचा दाखलाही देतो म्हणतो, " तुला म्हाईत हाय,त्या पाटण्याच्या गोंद्या गुजरांनं विलेक्ट्रिसिटी बोर्डाच्या तांब्याच्या तारा नि लोखंडी खांब चोरलं इसद पार्टी वाल्यान लगीच लावालावी केली·एका रातीत पोलिसांची धाड गोंद्याच्या मळ्यावर·मध्यान रातीला.आला माजं पाय धराईला आसं डोकं लढ्विल बाबा, समदी आपिलात निर्दोष"४९

सेक्रेटरीचे हात वर पर्यंत पोहोचलेले आहेत· भ्रष्टाचारी अधिका--यांच्या सगळ्या नाड्या त्याला सापडल्या आहेत· त्यामुळे कोणाला कशी लाच देवून आपले काम करून घ्यावयाचे हे त्याला चांगले जमते· पाटण्याच्या गोंद्याला तो भ्रष्टाचाराच्या आधारानेच वाचवतो, पुढे गोंद्याचं प्रकरण सांगताना तो म्हणतो " बाबूराव , सरपंचाला ठेवला आमच्या माडीवर लपवून· गावात दिली भूमका उठवून " पंढरीला गेलाय" म्हणून पंचनाम्यात पळवाटा ठेवायसाठी हजारानं रकमा मोजल्या हया हातानं· पायाशी चाळणा झाली बाबा रेटारेटी करतानं· उगाच न्हाई गोंद्या नडीतोडीला नारदागत हजर -हाईत कवाबी मद्यान रातीला "५०

सेक्रेटरीच्या चतुर आणि भ्रष्टाचारी वृत्तीचे खरे दर्शन घडते ते बाबूच्या कर्जप्रकरणी त्याने बँक अधिकारी भोसले साहेबांशी केलेल्या संवादात,

" तुम्ही गुरु असल्यावर काही कमी पडणार नाही आम्हाला ! साहेब तिरकस बोलला हे बाबूच्या लक्षात आलं नाही." [५१] (हा संवाद बाबूच्याही लक्षात आलेला नाही) पुढे सेक्रेटरीचे उद्गारसुद्धा निवेदक सूचकतेने सांगतो, " सेक्रेटरीनं सावधगिरीनं साहेबाला सांगितलं, " माजं कामच चोख हाय का न्हाई ? पर ही केसच येगळी हाय. माज्या घरचीच समजा. आजपातूर कदी काय कमी पडलंया का ? मग क्वा याचं आमी कोल्हापूरला ?"[५२] भोसले साहेब आणि सेक्रेटरी यांच्या मध्ये झालेल्या या संवादात वरकरणी पाहता काहीच वेडेवाकडे नसल्याचे वाटते. पण बारकाईने पाहिल्यास तो संवाद म्हणजे देण्या-घेण्याच्या गोष्टी असल्याचे लक्षात येते. वर अधोरेखित केलेल्या " काही कमी पडणार नाही आम्हाला" या शब्दात भोसले साहेबांना लाच अपेक्षित आहे तर " माजं कामच चोख हाय का न्हाई ?" या शब्दात सेक्रेटरीने लाच देण्याचे कबूल केले आहे,आणि खरोखरच पुढे सेक्रेटरीने अर्ज दाखल केल्या बरोबर सिग्रेटच्या मोकळ्या पाकिटात दहा-दहाच्या चार नोटा घालून ते को-या कागदांच्या गुंडाळीतून साहेबाच्या टेबलावर सरकवण्याची योजना बाबूला समजावून सांगितली.

कोर्ट कचे-यातील कामे उरकण्यासाठी अशा प्रकारची लाच द्यावी लागते हे त्याला पक्के माहित आहे. म्हणून तो बाबूला सूचना देतो, " मी सांगील तितं, सांगील तसं दोन, पाच, धा, आसं रूपय द्याचं आनमान करायचा न्हाई"[५३] सेक्रेटरीला हे सगळे रीतीरिवाज, व्यवहार माहीत असल्यामुळे तो सहजासहजी अशा कामात यशस्वी होतो. खरेदीखत करणारा मुख्य रजिस्ट्रार सुद्धा भ्रष्टाचारी आहे. हे ही त्याला पक्के माहीत आहे. म्हणून तो कागद उतारे रजिस्ट्रारच्या टेबलावर ठेवताना बाबूला दोन हजारांच्या बंडलावर वेगळे पंचवीस रुपये ठेवायला सांगतो.

सरकारी यंत्रणेला काय पाहिजे असते, हे त्याला चांगले समजले आहे. किंवा जगाचा व्यवहार त्याला समजला आहे. एवढे एकच कारण त्याच्या

यशा मागे नाही. सेक्रेटरी हा वाणीचा चतुर आणि चुरचुरीत आहे. हे त्याच्या यशाचे खरे कारण आहे. भोसले साहेबांशी त्याने केलेला चतुर संवाद आपण पाहिला. या शिवाय कितीतरी उतारे त्याच्या वाक्चातुर्याचे उदाहरण म्हणून देता येतील.

कर्ज प्रकरणी सेक्रेटरी बाबूला घेवून जेव्हा भोसले साहेबांकडे जातो त्यावेळी नवीनच दिसणा-या बाबूची साहेब चौकशी करु लागतात. ते त्याची काय करता ? कुठे असता ? पुढे काय करणार ? अशी चौकशी करतात, तेव्हा बाबू आणि साहेबांच्या या प्रश्नोत्तरी संवादाला चतुर सेक्रेटरी व्यवहारी वळण देतो. तो संवाद पहा.

" बी. ए. नंतर काय करणार आहात ? " साहेबांनी बाबूला विचारलं. बाबूनं तोंड उघडायच्या आत सेक्रेटरी मोका साधून साहेबांना म्हणाला, " आता त्यो करतुया वांगी नि बटाटं आवो साहेब त्येचा बा खुतलाय नोकरी धर म्हून. घरातनं भाईरच सोडाइला तयार न्हाई. नुस्ती राक घालून घेतलीया टकु-यात. तवा आला माज्याकडं रडगानं घेवून ' अबाची समजूत काडा' म्हणून " सेक्रेटरीनं दम खावून वाक्य पुरं केलं, " त्येचा आबा काय मला वटंना, तवा आलो तुमच्याकडं"[५४]

खरे पाहता साहेबांच्या प्रश्नावर बाबू आपले, बी.ए. नंतर एम. ए. किंवा लॉ करणार " असे सरळसोट उत्तर देणार असतो. पण सेक्रेटरीला निदान या प्रसंगापुरते तरी बाबूच्या पुढच्या शिक्षणाचे कौतुक नाही. त्याला फक्त कर्ज कसे मिळवायचे एवढा एकच ध्यास आहे. म्हणून तो बाबू-बद्दल साहेबांच्या मनात सहानुभुती निर्माण झाली आहे हे हेरुन मोका साधून तो मध्येच संवादाला वेगळे वळण लावतो.

सेक्रेटरीच्या संवादातील खुसखुशीतपणा आणखी पाहता येईल, एस. टी. मध्ये गर्दी असूनसुद्धा तो आपल्या संभाषण चातुर्याने ओळखी काढून बाबूला व आपल्याला बसायला जागा मिळवतो आणि बूड स्थीर झाल्यावर त्याची वाणी खुलायला लागते.

" बगा सायेब, हितं तुमास्नी कुणी सरकासरकी करून जागा दिली असती का ? आवो, जरा बोलाय शिका"[५५]

या जगात बोलणा-याच्या एरंड्या सुद्धा खपतात हे सेक्रेटरीला चांगले माहित आहे. अगदीच बोलायला विषय नसला की तो राजकारणावर घसरतो.

" सायेब, हया आमदारनामदाराची काशीला गेली. आपल्या भागाला पानी दिलं का बगा की" .....

" तुज्या सारख्या शिकल्यासवरल्याच्या पोरांनी हयास्नी आडवं लावाय पाहिजे काय पावनं, मी म्हंतोय ते खरं हाय न्हव

म्हणून सेक्रेटरीनं शेजारच्या सोतेकर पाव्हण्याला बोलण्यात ओढला"

" त्यो पनाळ कोडोलीचा माळ कसा फुल्लाय बगा, फोंड्या माळाव वारना सहकारी साखर कारकाना हुबा -हायला. तितं मराय आपल्या तालुक्यातलं गाडीवान जात्यात. हाय कोन धनी आपल्या फाटयाला."[५६]

अशा या बोल घेवड्या सेक्रेटरीचा बाबूच्या पार्टीला आधार वाटतो. कोर्टकचे-यांची कामे त्याच्या शिवाय कोणाला जमणार नाहीत असा अनेकांचा विश्वास आहे. थोडक्यात त्याच्या इच्छेप्रमाणे अशा कामात त्याच्या शिवाय पान हालत नाही. म्हणूनच नागझरीचा कागद करण्यासाठी दोन्ही पार्टीचे लोक जमूनही ते सेक्रेटरी विना खोळंबून आहेत. त्यातून रामा म्हणतो

" कशाला वाट बगाईची सेक्रेटरीची ? कोळगावकराला सांगूया कागूद लिवाय आपूनच"[५७] तेव्हा गणपूअण्णा त्याला म्हणातो, " आरं, त्यात लई खाचाखोचा असत्यात तुमाला न्हाई कळाइचं, उगच न्हाय तुकारामबाबा सांगून गेला, तितं पाईजे जातीचं, येरा गबाळ्याचं काम न्हवं"[५८]

सेक्रेटरी बोलघेवडा आहे हेच त्याचे वैशिष्टय आहे. पण त्याच्या बोलण्यात अनेकदा स्वत:बद्दलची बढाई दिसते. जी बढाई बडबड्या स्वभाव असलेल्या माणसांमध्ये स्वाभाविकपणे येते. सातत्याने बडबडत राहण्याची सवय लागून गेल्या मुळे अशा लोकांच्या बोलण्यात साहजिकपणे एकवाक्यता न राहता वेगवेगळे सूर उमटत राहतात. मग त्यामध्ये कधी बढाईखोरपणा,

कधी, अतिशयोक्ती तर कधी चक्क थापा, एखादयाची कुचेष्टा, एखादयाची तोंडभर स्तुती, कधी वायफळ बडबड असे काहीना काही त्यांच्या तोंडून येत राहते. सेक्रेटरी म्हणजे नेमकी याच पठडीतील वल्ली आहे.

<u>संघर्ष</u>

संघर्षा शिवाय कादंबरीची कल्पना निरर्थक ठरते. सपाट जीवनचित्रणाने कादंबरी होऊ शकत नाही. तीमध्ये जीवनाचे संघर्षमूलक चढउतार यावे लागतात तेव्हा ती रंजक आणि वाचण्यायोग्य बनते.

आनंद पाटील यांची कागूद ही लघुकादंबरी वाचणीय ठरते कारण तिची संघर्षप्रधानता. पानापानावर या कादंबरीत लहान-मोठे संघर्ष घडतात. म्हणून कादंबरीचे कथानक संघर्षमूलक आहे. पांडू जाधवकडे ज्याचे शेत गहाण पडलेले आहे तो किसन बनसोडे मेलेला आहे. या किसनला एक मुलगा होता जो गहाणवट जमिनीचा वारसदार असतो तोही अचानक मरण पावतो. त्याच्या मृत्युमुळे गहाणवट जमीन कोणाच्या ताब्यात जाणार असा प्रश्न निर्माण होतो. आणि हा प्रश्न संघर्षाचे कारण ठरतो.

नागझरीवर एकीकडून किसन बनसोडेचे चुलत भाऊ हक्क दाखवण्यास पुढे सरसावतात. तर दुसरीकडून किसनच्या तीन लग्न झालेल्या मुली आणि त्यांचे नवरे म्हणजे किसनचे जावई. पण पांडू जाधवही नागझरीवरील हक्क सोडण्यास तयार नाही. कारण ग्रामीण भागातील गहाणवटीचे व्यवहार हे तारण बळकावण्याच्या हेतूनेच केले जातात. इथे पांडू जाधवच्या वडिलांनी किसन बनसोडे कडून नागझरी गहाणवट म्हणून ठेवून घेतली त्यामागेही हा हेतू आहे. अशा परिस्थितीत संघर्ष होणे अपरिहार्य ठरते. म्हणून" कागूद" या लघुकादंबरीचे कथानक संघर्षमूलक ठरते.

तथापि " कागूद " मध्ये होत असलेले संघर्ष केवळ कथानकातून उद्भवत नाहीत तर पांडू जाधव यांच्या स्वभावामुळे बरेच संघर्ष निर्माण झालेले आढळतात. आबाचा स्वभाव तापट, चिडखोर आहे. त्याच्या संवादात कसा रूक्षपणा आहे हे आपण " आबा" च्या व्यक्तिचित्रणात पाहिले. आबाच्या

संवादामुळे प्रस्तुत कादंबरीत व्यक्ती-व्यक्ती पातळीवरील संघर्ष जागोजाग आलेले आढळतात. कुटुंबप्रमुख पांडू जाधवच्या चिडखोर स्वभावामुळे त्याच्या घरात सतत एक ताणाव असलेला पहावयास मिळतो. हा ताणाव आबा बाबू, आबा-नाना, आबा-आई अशा संघर्षात रूपांतरीत होताना आढळतो.

सर्व संघर्ष मानसिक पातळीवर घडतात. शारीरिक संघर्ष लघुकादंबरीत जवळ-जवळ नाहीत. अत्यंत उग्र स्वरूपाचे मानसिक संघर्ष कादंबरीत येतात. याला फक्त बैलजोडी विकण्याच्यावेळच्या प्रसंगाच्या अपवाद आहे . कारण हा प्रसंग अत्यंत नाजूक संघर्षाचे दर्शन घडवतो. तो संघर्ष पहा.-

नागझरीची खरेदी आणि रजिस्ट्री करण्यासाठी पैशाची गरज आहे. पण पैसा कोठून जमा करावा हे बाबूला कळत नाही. म्हणून बाबू आणि त्याचा चुलता नाना हे दोघे गुपचूप बैलजोडी विकण्याचे ठरवून बैलजोडी बाहेर काढतात. बैलजोडी विकण्यास म्हातारीचा विरोध आहे. कारण तिच्या-साठी तिच्या मेलेल्या पतीची तेवढी एकच आठवन आहे. त्यामुळे बैलजोडी विकण्यास त्यातही " निशाण" या बैलास विकण्यास तिचा मनापासून विरोध आहे. बैलजोडी फोडून विकायची म्हटली तर त्याला कोणी घेणार नाही हे दोघांना पक्के माहित आहे. बैलजोडी विकली तर शेत कसे पिकवायचे हा प्रश्नही नानाबरोबर बाबूच्याही डोक्यात घोळत आहे. अशा या मानसिक संघर्षात भर म्हणून शिवेशेजारचा गाववाला पाव्हणा जाता-जाता निशानकडे बघून " हयो बैल इकलासा तर तुमचं बरं हुणार न्हाई येवढंच सांगतु या उपर तुमाला कराईच त्ये करा"[५९] असे बोलून आणाखिनच कोड्यात टाकून जातो. तर दुसरा एक पाव्हणा जाता-जाता सांगून जातो, " बैलं पुना मिळतील, पर शेत सोडू नका"[६०] अशा परिस्थितीत एका मानसिक संघर्षात नाना, बाबू आणि रामू असल्याचे जाणवत राहते.

समुहा-समुहातील संघर्ष

या लघुकादंबरीतील समुहा-समुहांतर्गत काही संघर्ष छुपा आहे तर काही ठिकाणी हा संघर्ष उघड आहे. छुपा संघर्ष कथानकात प्रत्यक्ष नयेता निवेदकाच्या निवेदनामधून स्पष्ट होतो. किसन बनसोडे वारल्यानंतर

त्याचे शेत बळकावण्यासाठी चाललेल्या संघर्षाबद्दल निवेदक रामूच्या तोंडूनच सांगतो, " तुमी स्वत:च्या पायावर हुबा -हाताय त्ये बगवना तवा किसन्याचा पोरगा मुंबईला खपल्याचं कळल्या बरोबर लेकी वारसाचं भूत लावलया तुमच्या मागं. गावात गाठीला पैका बांधून लईजण टपल्यात नागझरीवर"[६१] या निवेदनातून नागझरी शेताबाबत गावात अंतर्गत बरीच धुसफूस चालल्याचे स्पष्ट होते. बाबूचा दोस्त रामू पुढे सांगतो, " बांबूडकर डायवरनं सोनावड्याच्या बंडकरी दादूला नवटाक पाजून तुज्या चुलत्याची-नानाची गाडी आड्वाय लावली. त्याधरनं नानानं मान टाकलीय." [६२]

अशा प्रकारचे अप्रत्यक्ष संघर्ष काही ठिकाणी येत असले तरी निवेदक समूहा-समूहामधील काही प्रत्यक्ष संघर्ष सुद्धा कथन करतो. साठेखत करण्याच्या वेळी पांडू जाधव गट आणि बांबूडकर ड्रायव्हर गट यांच्यातील पानं नं १४, १५, १६ व १७ वरील जुगलबंदी पहा यामध्ये ओतप्रोत संघर्ष भरलेला दिसून येतो. दोन्ही गट साठेखत करण्यासाठी एकत्र जमलेले आहेत. परंतु त्यातही ते एकमेकावर तुटून पडतात. एकमेकाच्या बोलण्यातील खुंट काढत असलेले दिसतात. पुढे नागझरीची रजिस्ट्री करण्यावेळी असाच समूहा-समूहा मध्ये संघर्ष असलेला दिसतो.

व्यक्ती अंतर्गत संघर्ष

आबा x बाबू - नाना - आई-

या लघुकादंबरीत पृष्ठ ६, ७, ८ व ९ पानावर जो संघर्ष येतो तो आबा - बाबू- नाना यांच्यामधील आहे अर्थात या संघर्षाचे स्वरूप आबा विरुद्ध बाबू, आबा विरुद्ध नाना असे आहे. बाबू " आईकटी"च्या बाहेर गेल्यामुळे आबाचा बाबूवर राग कायम आहे. तर नानाचे गावातल्या गुरुंनी कान फुंकले आहेत असा आबाला संशय आहे. त्यामुळे नानावरही आबाचा रागआहे. हे पुढील संघर्षाचे कारण आहे.

बाबू नागझरीची भानगड मिटवण्यासाठी गावात येतो. आबा त्याला आलेली नोटीस दाखवतो. ती नोटीस पाहून बाबू सहजपणे म्हणतो, पोकळ धमकीचं सार्थ पत्र दिसतय हे त्यावर आबा तिरसटपणे म्हणतो,

" आता तू पडलास बालिस्टर आमाला कळत्यात ढेकळं-हयेला उत्तर सांग"?[63] आबांच हे तिरसट उत्तर आजीला खटकते म्हणून ती म्हणते," आरं प्वांर सरळ इच्यारतया नि तू का वाकड्यात शिरतूयास ?"[64] आजीच्या अशा बोलण्याची संधी सापडल्यामुळे बाबूची आई लगेच म्हणते,

" जल्माची खोड हाय ती मामी"[65]

पण आबाला आपल्या बायकोचे टोचणे आवडत नाही तो तिच्यावर ओरडतो.

" ये मैना फुर कर श्याणपणा भांडी धास जा."[66]

आबाच्या अशा तिरसट बोलण्याचा बाबूच्या आईला मनातून राग आहे. म्हणूनच ती अशी नामी संधी सोडत नाही.

आबा बोलताना नानाला टोले मारत बोलतो तो म्हणतो, " पर हितं आमचं सारंच खुडाकलेया गावातलं बनसुड्याचं लुंगसुंग आमाला दम द्याला लागलं तर कराईचं काय ?[67]

बनसुड्याचं लुंगसुंग या शब्दात आबाला " नानाला " डिवचायचे आहे या उद्‌गारामुळे पुढे भाऊ्याला तोंड फुटते. नानाला हा आबाचा टोला लागतो. तो मध्येच म्हणतो,

" बाबू तुमीच बापल्या - काडा तोडगा आमचं गाव हाय लई बोलाचं आपल्याबशी न्हाई छिडकी"[68]

आबा लगेच रागाने पुढे म्हणतो,

" आगा ये गबरु बासकर तुजं श्यानपणा तुजा राकनंवर आमाला न्हाई हये श्येत सोडाइचं "[69]

यावर नाना म्हणतो, " बाबू तुमी करा खरिदी पर मला जमंत धरु नका"[70] तेव्हा आबा चिडून म्हणतो," आरं उद्या सादल्याल्याचा वाटंकरी हुशील तवा" ?

" मला नगं त्या शेताची वाटनी " नाना
" दे तसं लिवून लेखी भडव्या " आबा
" घे लिवून आत्ताच बाबू लिव काय पायजे त्ये " ७१

वरील प्रकारचे साधे-साधे संवाद भांडणाचे रूप घेताना दिसतात, एकूण या कादंबरीतील साधे-साधे घरगुती प्रसंग आबाच्या तिरसट स्वभावामुळे भांडणाकडे झुकतात आणि तिथे संघर्ष झालेला पहावयास मिळतो. यातून ग्रामीण जीवनाचे दर्शन वाचकास घडत जाते.

## कादंबरीची भाषा

कादंबरीचा नायक बाबू हा पन्हाळा तालुक्यातील शित्तूर सारख्या दुर्गम खेड्यातून सातारा सारख्या पुणे संस्कृतीला जवळ असलेल्या शहरात शिक्षणासाठी गेलेला आहे. तो बी.ए.च्या दुसऱ्या वर्गात इंग्रजी हा स्पेशल विषय घेवून शिकत आहे. हळू हळू त्याच्यावरील ग्रामीण संस्कार पुसले जावून तो शहरी पांढरपेशी होऊ पाहतो आहे. गावाकडच्या राडीत पुन्हा जायचे नाही असे ठरवतो आहे. पण पुन्हा आई वडिलांच्या कळकळीच्या पत्रांना बळी पडून तो गावी परत येतो. म्हणजे त्याची गावाशी असलेली नाळ अजून पूर्ण तुटलेली नाही. अशा द्विधा परिस्थितीतील मानसिकतेचा आणि या मानसिकतेवर आधारलेल्या आशयाचा विचार करता त्यास साजेशी अशी भाषा लेखकाने वापरलेली आहे. क्षणात शहरी क्षणात ग्रामीण अशी रूपे पालटणारी संमिश्र भाषा या कादंबरीच्या आशयाला अगदी जवळची आहे.

बाबू गावाला परत येतो आणि त्याच्याही नकळत तो ग्रामीण, गावठी बोलू लागतो. याची जाणीव होऊन तो मनोमन ओशाळतो. तथापि बाबू शहरी भाषा सराईतपणे वापरू शकतो अशातलाही भाग नाही. कारण वकिलाशी नागर बोलण्याचा त्याला आटोकाट प्रयत्न करावा लागतो. उदा. शिवा, नामा.सखाराम, तारू सगळी शाळेला जातात ना आजी ? " ७२ वरील अधोरेखित उद्गारात शहरी आणि

ग्रामीण भाषेचे मिश्रण पहावयास मिळते. वकिलांच्या समोर बाबू नागर भाषा बोलण्याचा आटोकाट प्रयत्न करतो त्याचा नमुना पहा.-

" त्यांनीच ही जमीन विकायला काढली आहे. पण किसनच्या भाऊबंधांनी ती नोटीस पाठवलीय आम्हांला"७३

काही ठिकाणी बाबू इंग्रजी मिश्रीत मराठी बोलतो तर काही ठिकाणी शुद्ध इंग्रजी बोलतो त्याचे उदाहरण पहा.-

" होय सर, पण ही प्रोफेशनल ऑनेस्टी दुर्मिळच" बाबू

" थँक्स सर, धिस इज युवर नोटिस.वुई हॅव कम फॉर युवर ॲडव्हाइस"७४

कागूद लघुकादंबरीचा नायक हा इंग्रजी स्पेशल विषय घेवून बी.ए. करणारा आहे. त्यामुळे कादंबरीच्या भाषेमध्ये इंग्रजीतील आणि प्रमाण मराठीतील शब्द येताना दिसतात. नवशिक्षित इंग्रजी असल्यामुळे आपल्याला येणा-या इंग्रजीचा व्यवहारात उपयोग करावा किंवा आपल्याला येणारे इंग्रजी समोरच्या व्यक्तिच्या निदर्शनास आणावे ही त्याची मनोवृत्ती साहजिक आहे. असे असले तरी बाबू हा उताविळ नाही. कारण जिथे आवश्यक तिथेच तो आपल्या इंग्रजीचे प्रदर्शन मांडतो आणि हे त्याचे वर्तन एका शेतकरी कुटुंबातील चिकाटीने शिकणारा विद्यार्थी म्हणून योग्य आणि वास्तव आहे. त्यानुसार इंग्रजी संवाद कादंबरीत काही ठिकाणी येतात.

तथापि या कादंबरीतील भाषेचे खरे सामर्थ्य दडले आहे. ते लेखकाने वापरलेल्या वाक्प्रचार आणि म्हणीत. कारण अत्यंत चपखल बसतील अशा अर्थाच्या आणि अत्यंत सहजतेने वाक्प्रचार व म्हणी वापरण्याचे लेखक आनंद पाटील यांचे कसब उल्लेखनीय आहे. या कादंबरीत प्रादेशिक वैशिष्टयपूर्ण असे अनेक वाक्प्रचार व म्हणी आलेल्या आहेत. त्या कोणत्या हे आपण पुढे पाहूच.

अशा प्रकारचे वाक्प्रचार आणि म्हणी इतक्या विपूल प्रमाणात आणि सहजतेने मराठी ग्रामीण कादंबरीत प्रथमत:च येत असल्याचे दिसते.

आणि यामुळेच लेखक आनंद पाटील यांची लेखनशैली ताजी आणि रसरशीत वाटते. १९७५ नंतरच्या कादंबरीचे वेगळेपण नमूद करताना त्यांनी वापरलेल्या लवचिक भाषेचा विचारच प्रामुख्याने अपेक्षित आहे. त्यांचे वेगळेपण उठून दिसते त्याचे मूळ कारण म्हणजे त्यांची भाषा शैली हेच आहे.

आनंद पाटील यांची लेखन शैली सह्याद्रीच्या कड्याकपारीत घडलेल्या माणसांची, गुंतागुंतीची जडण-घडण चित्रित करण्यास केवळसमर्थच नाही तर त्यासाठीच तिने जन्म घेतला आहे असे वाटावे. कारण कादंबरीच्या कथानकाचा विचार करता ते एका वाक्यात सांगता येते. ते म्हणजे " शेतीचे खरेदीखत करताना येणा-या अडी अडचणी. पण हे खरेदी खत करणारी माणसे आणि ह्याला विरोध करणारी माणसे, अडचणींना तोंड देणारी माणसे यांचे चित्रण करताना या भाषेचा खरा कस लागतो. आणि यामुळेच कादंबरी समृध्द झालेली आढळते.

संवाद

" कागूद " ही लघुकादंबरी " माणसांनी " गजबजलेली आहे. यातील माणसे बेरकी, तापट, फसवी, अशा वेगवेगळ्या कंगो-यांची आहेत. कादंबरीचा " संवाद " हा घटक माणसांचे किंवा पात्राचे कंगोरे अविष्कृत करण्यासाठी प्रभावी घटक आहे. त्याप्रमाणे लेखक आनंद पाटील यांनी अत्यंत जीवंत संवादाद्वारे आपल्या पात्रांना शब्दबध्द केलेले आहे. बाबू जेव्हा आपल्या घरात गुपचूप येतो तेव्हा लांबचे न दिसणा-या म्हातारीचा संवाद पहा

" आरं कोण ऱ्यो ? काय पायजे ? त्वांड दिलय का देवानं ?
मला लांबचं दिसत न्हाई बाबा " आजी.

" चोर आलाय आजी तुझी गाडग्यात पुरलेली ठेव दे " म्हणत बुट काढून बाबू आजी जवळ येऊन बसला.
त्यांच्या तोंडावर दोन्ही हात फिरवून अंग चाचपीत आजी बोलली,

" कशी वाट चुकली रं चोरा आजीची ठेव असती तर घरात इगिन लागाइची वेळ कशाला आली असती ?" ७५

वरील संवादात आजीचे आंधळेपणा, बाबूचा गमती स्वभाव आणि कथानकातील पैश्याच्या टंचाईचा पीळ इतक्या गोष्टी लक्षात येतात या वरुन पाटील यांचे संवाद हे भरीव असलेले आढळतात. संघर्ष व्यक्त करणारे संवाद तर पाटील यांनी अत्यंत चढत्या कृमाने रेखाटलेले आहेत.

उदा. " बाबू, मला न्हाई गावाचं जोड खाया जमाईचं, तुला न्हाई कळाइचं हया गावाचं पानी तुला हात जोडून सांगतू मला हिसेबात धरु नगं"

" आरं उद्या सादल्याल्याचा वाटंकरी हुशील तवा ?" आबाने तिरक विचारलं.

" मला नग त्या शेताची वाटनी " म्हणून नानानं तुकडा पाडला

" दे तसं लिवून लेखी भडव्या " आबा म्हणाला,

" घे लिवून आताच बाबू लिव काय पायजे त्ये" नानाही तापला" ७६

प्रस्तुत कादंबरीच्या यशस्वीते पाठीमागे संवादांचा वाटाच फार मोठा असलेला दिसतो. कादंबरीतील पात्रे बेरकी आहेत. हे त्यांच्या बोलण्यातून जाणवते आणि हे त्यांचे बेरकीपण लेखकांनी अचूकपणे इथे टिपलेले आहे. संवादात वाकप्रचार आणि म्हणींचा भरपूर उपयोग केलेला असल्यामुळे संवाद रसरशीत वाटतात.

उदा. " सेक्रेटरी तुमी उडत्याची नोंद ठेवणारी मान्स, आडान्याचा नाडा गाड्यालाच बरा." ७७

" आरं झोपा की गप श्यान्यानू, आवसंला येवजल्यालं घडत न्हाय नि शिजल्यालं तोंडात पडत न्हाय, पावना आलाय रातीचा दिसकरुन पडा आता सकाळच्या पारी बोलू निवांतवानी." ७८

अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

एकंदर आनंद पाटील यांची लेखन शैली नाटयात्म असलेली दिसते. माणूस आणि घटना यांचे बारकावे अत्यंत संवेदनेने टिपते. संवाद हा नाटकाचा आत्मा असतो हा आत्मा या कादंबऱ्याचाही आत्मा असलेला दिसतो.

## ग्रामीण बोली भाषेचे विशेष

" कागूद " च्या भाषेचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे या भाषेत लेखकाने ग्रामीण म्हणी, वाक्प्रचार आणि अनोळखी शब्दांचा मोठ्या प्रमाणात केलेला वापर. काही म्हणी आणि वाक्प्रचार या अगोदरच्या ग्रामीण कादंबरीत आलेले नाहीत.

### म्हणी

१. जाईन हनुमान करायला नि हुईल माकड
२. नागड्यापाशी उगडं गेलं
३. वाघाच्या घराला शेळी पावणी आलीया कापली काय नि भाजली काय ?
४. हकदीसाठी नवरी मोडू नगा
५. कुटंबी झाडाच्या मुळ्या मातीतच असत्यात
६. वाघाशी विटी दांडू खेळून कसं चालंल
७. आमचं काय, पानाला न्हाय कात, गावात न्हाय पत, तशातली गत.
८. तितं पाहिजे जातीचं, येरा गबाळ्याचं काम नव्हं
९. शिंग मोडून वासरात घुसतोय
१०. पाण्यात राहून माश्यासंग वैर
११. काकरीसाठी चाकरी पत्करावी
१२. आवसला येवजल्यालं घडत न्हाय नि शिजल्याल तोंडात पडत न्हाय.

### वाक्प्रचार

१. कुराडीच्या दांड्यावर थुकी
२. हागु लेंडी उडायची
३. म्हशीची शिंग म्हशीला जड नसत्यात
४. किरडीचा दांडा हासडला
५. काणी कत्ताणी वाणीन झाली उत्तानी
६. आळणी आंबट खाऊन दिवस काढणे

७· नरमाईन काटा टोचला

८· पेंडी पाडत्या बग·

शब्द
----

उचका, कताण्या, आईकटी, दुचमाटला, दास्तानी, दवादवा, पैवाट, ताबलाय, न्वांड, व्याज, ब्याजवार, जाणासळं, बेलतगाई, बालिंगा आयागमनी, श्याकभरली, आकिरचं बोला, उभायत, रिवाज, कमीजापा, कुमानून·

वरील प्रकारच्या म्हणी, वाक्प्रचार, आणि शब्द यांचा लेखकांनी चपखल उपयोग केल्यामुळे, भाषेला एक वेगळीच लज्जत आलेली आहे· वरील वैशिष्टयामुळे आनंद पाटील यांची भाषा शैली ग्रामीण जीवन चित्रण करण्यास समर्थ असलेली दिसते·

समारोप
------

अशा प्रकारे रुढ अर्थाने कथानक नसलेली पण ग्रामीण मनाला अत्यंत कौशल्याने चित्रित करणारी आनंद पाटील यांची कागूद ही पहिलीच कादंबरी लक्षणीय ठरते· कादंबरीचा नायक बाबू हा पांढरपेशी होऊ पाहतो आहे· ग्रामीण संस्कार पुसून टाकण्याचा प्रयत्न करतो आहे· अशा मानसिक स्थलांतराच्या अवस्थेत बाबूच्या भाषेचेही स्थलांतर घडत असलेले दिसते ग्रामीणतेकडून तिचा प्रवास शहरी प्रमाण भाषेकडे व्हायला लागला आहे· त्यामुळे बाबूची भाषा ग्रामीण नागर- इंग्रजी अशा सरमिसळ प्रकारची असलेली दिसते·

शिकून मोठे होण्याची बाबूची धडपड, जिद्द या उलट आबाचा त्याच्या शिक्षणावरील राग अशा संघर्षातून दोन वैशिष्टयपूर्ण व्यक्तिमत्वे हाताशी लागतात· सेक्रेटरी सारखे आगळे वेगळे पात्र ही या लघुकादंबरीत पहावयास मिळते· कोर्ट-कचे-याच्या कामात पारंगत असलेल्या सेक्रेटरीला गावात मान असतो याशिवाय त्याची हरहुन्नरी वृत्ती आणि बेरकी स्वभाव मनावर

कायमपणे ठसतो.

" कागूद " करणे म्हणजे खरेदीखत ( रजिस्ट्री ) करणे. हे खरेदीखत करताना येणा-या अडचणी एवढया एका बाजूने प्रस्तुत कादंबरीत ग्रामीण जीवनदर्शन घडते. ते सर्वांगीण नाही. पण परिपूर्ण मात्र आहे.

या कादंबरीचे जे वैशिष्टय आहे ते प्रामुख्याने तिच्या भाषेत दडलेले आहे. हे विशेष कोणकोणते हे ही आपण पाहिले. या भाषेत येणारे नवीन वाक्‌प्रचार नवीन शब्द आणि चपखल बसणा-या म्हणी अशा भाषेच्या लवचिक स्वरुपामुळे या कादंबरीच्या निमित्ताने मराठी ग्रामीण कादंबरीला तिचा सूर सापडला आहे. तिचे स्वायत्त स्वरुप आणखी भरीव झालेले आहे. असे म्हणावे वाटते. म्हणूनच प्रस्तुत कादंबरी १९७५ नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीत लक्षणीय ठरते.

याच लेखकाची " सावली " ही दुसरी लघुकादंबरी सुद्धा वैशिष्टयपूर्ण कशी ठरते याचा आता अभ्यास करु.

संदर्भ


१. ठाकूर र. बा. : मराठी ग्रामीण कादंबरी
मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती पहिली
१९९३ पृ.

२. डहाके, वसंत आबाजी : १९८६ मधील कादंबरी - आढावा, ललित,
मे/जून १९८७, पृ. ३०.

३. पाटील, आनंद : कागूद आणि सावली
मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती पहिली १९८६ पृ. २

४. तत्रैव पृ. ५

५. तत्रैव पृ. ५

६. तत्रैव पृ. १४

७. तत्रैव पृ. १७

८. तत्रैव पृ. १७

९. तत्रैव पृ. १७

१०. तत्रैव पृ. ५०

११. तत्रैव पृ. ७

१२. तत्रैव पृ. १०

१३. तत्रैव पृ. ६

१४. तत्रैव पृ. ७

१५. तत्रैव पृ. ४९

१६. तत्रैव पृ. ७

१७. " " ७

१८. तत्रैव पृ. ७

१९. तत्रैव पृ. ७

२०. तत्रैव पृ. ८

२१. तत्रैव पृ. ८

२२. तत्रैव पृ. १२

२३. तत्रैव पृ. १२

२४. तत्रैव पृ. १२
२५. तत्रैव पृ. ११
२६. तत्रैव पृ. १४
२७. तत्रैव पृ.११
२८. तत्रैव पृ.१०
२९. तत्रैव पृ. ५४
३०. तत्रैव पृ. ५४
३१. तत्रैव पृ. ५१
३२. तत्रैव पृ. ४५
३३. तत्रैव पृ. ४९
३४. तत्रैव पृ. ५७, ५८.
३५. तत्रैव पृ.५८
३६. तत्रैव पृ. ५८
३७. तत्रैव पृ. ३९
३८. तत्रैव पृ. १७
३९. तत्रैव पृ. ३०
४०. तत्रैव पृ. ३०
४१. तत्रैव पृ. ३१
४२. तत्रैव पृ. ३१
४३. तत्रैव पृ.४१
४४. तत्रैव पृ. ३३
४५. तत्रैव पृ. ३०
४६. तत्रैव पृ. ३१
४७. तत्रैव पृ. ४०
४८. तत्रैव पृ. ४०
४९. तत्रैव पृ. ४०
५०. तत्रैव पृ. ४०

५१. तत्रैव पृ. ४३

५२. तत्रैव पृ. ४३

५३. तत्रैव पृ. ५१

५४. तत्रैव पृ. ४२

५५. तत्रैव पृ. ३८

५६. तत्रैव पृ. ३[illegible]

५७. तत्रैव पृ. ४७

५८. तत्रैव पृ. ४७

५९. तत्रैव पृ. २५

६०. तत्रैव पृ. २७

६१. तत्रैव पृ. २

६२. तत्रैव पृ. ३

६३. तत्रैव पृ. ७

६४. तत्रैव पृ. ७

६५. तत्रैव पृ. ७

६६. तत्रैव पृ. ७

६७. तत्रैव पृ. ७

६८. तत्रैव पृ. ८

६९. तत्रैव पृ. ८

७०. तत्रैव पृ. ८

७१. तत्रैव पृ. ८

७२. तत्रैव पृ. ५

७३. तत्रैव पृ. १३

७४. तत्रैव पृ. १५

७५. तत्रैव पृ. ४

७६. तत्रैव पृ. ८

७७. तत्रैव पृ. ३८

७८. तत्रैव पृ. २९.